मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या विशेष अनुमती याचिका क्र.६३९२/२०१६ मधील आदेशानुसार मुंबईचे नगरपाल कार्यालयातील उपनगरपाल या पदास दि. ४ जुलै, २००३ पासून रु.१४२००-३५०-१५९५०-४००-१८३५० ही वेतनश्रेणी मंजूर करण्याबाबत..........

महाराष्ट्र शासन
विधि व न्याय विभाग,
शासन निर्णय क्रमांक : शेरीफ -१६१४/प्र.क्र.६९/का- नऊ
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२,
दिनांक : १५ मे, २०१८.

वाचा :- १) मा.उच्च न्यायालयाने रिट याचिका क्र.१९८५/२०१४ च्या संदर्भात दि.१७.२.२०१५ रोजी दिलेले आदेश.
२) मा.सर्वोच्च न्यायालयाने विशेष अनुमती याचिका क्र.६३९२/२०१६ च्या संदर्भात दि.१७.३.२०१६ रोजी दिलेले आदेश.
३) या विभागाचा शासन निर्णय समक्रमांक दिनांक १६ सप्टेंबर, २०१६.

प्रस्तावना :-

श्री.अ.म.काझी, तत्कालीन उपनगरपाल यांनी "उपनगरपाल या पदाच्या वेतनश्रेणीमध्ये सुधारणा करण्याबाबत" मा.उच्च न्यायालयामध्ये रिट याचिका क्र.१९८५/२०१४ दाखल केली होती. या रिट याचिकेमध्ये दिनांक १७/०२/२०१५ रोजी खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात आले:-

In the result, the writ petition is allowed. Rule is made absolute in terms of prayer clause (i) and (ii) which read as under:

i) To put on par the post of Deputy Sheriff of Mumbai with the post of First Assistant Master on the original Side of the High Court of Bombay as regards pay scale and benefits :

ii) To grant to the petitioner and post of Deputy Sheriff the pay scale of Rs.14200-350-15950-400-18350 w.e.f. 4th July, 2003 to 31st December, 2005 and Rs.43690-1080-49090-1230-56470 w.e.f. 1st January, 2006 till 28th February, 2013 including all consequential and retirement benefits;

या आदेशाविरुध्द मा.सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका क्र.६३९२/२०१६ दाखल करण्यात आली होती. सदर विशेष अनुमती याचिकेमध्ये दि.१७.३.२०१६ रोजी सुनावणी झाली.

त्यामध्ये खालीलप्रमाणे आदेश देण्यात आले आहेत:-

'We see no reason to interfere with the impugned order dated १७.२.२०१५ passed by the High Court.'

The special leave petition is accordingly dismissed.

अशाप्रकारे मा.उच्च न्यायालयाने रिट याचिका क्र.१९८५/२०१४ मध्ये दि.१७.२.२०१५ रोजी दिलेल्या आदेशामध्ये हस्तक्षेप करण्याचे कोणतेही कारण आढळून येत नसल्याचे नमूद करुन मा.सर्वोच्च न्यायालयाने विशेष अनुमती याचिका क्र.६३९२/२०१६खारिज केली. सदर आदेशानुसार श्री.अ.म.काझी, तत्कालीन उपनगरपाल यांना दि.४ जुलै, २००३ ते ३१ डिसेंबर, २००५ या कालावधीत न्या.शेट्टी आयोगानुसार रु.१४२००-३५०-१५९५०-४००-१८३५० ही वेतनश्रेणी व दि.१.१.२००६ ते दि.२८.२.२०13 (श्री.काझी यांच्या सेवानिवृत्तीपर्यंत) या कालावधीत न्या.पद्मनाभन समितीच्या शिफारशीनुसार रु.४३६९०-१०८०-४९०९०-१२३०-५६४७० ही वेतनश्रेणी व त्यानुषंगाने भत्ते अनुज्ञेय करण्यात आले आहेत व त्यानुषंगाने मुंबईचे नगरपाल कार्यालयाकडून करण्यात आलेल्या परिगणनेनुसार रु.२०,१०,६३२/- (रुपये वीस लक्ष दहा हजार सहाशे बत्तीस फक्त) इतक्या रकमेस शासन निर्णय दि. १६ सप्टेंबर, २०१६ अन्वये मान्यता देण्यात आली आहे. सबब मा.उच्च न्यायालयाच्या आदेशातील क्रमांक दोन ची पूर्तता झाली आहे. त्यानंतर सदर आदेशातील क्रमांक १ नुसार मुंबईचे नगरपाल या कार्यालयातील "उपनगरपाल" हे पद मा. उच्च न्यायालय, मुंबई येथील First Assistant Master (प्रथम सहाय्यक प्रबंधक) या पदाशी वेतन व भत्यांच्या अनुषंगाने समकक्ष करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

<u>शासन निर्णय :-</u>

मा.उच्च न्यायालयाने रिट याचिका क्र.१९८५/२०१४ मध्ये दि.१७.२.२०१५ रोजी दिलेले आदेश व याविरुध्द मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या विशेष अनुमती याचिका क्र.६३९२/२०१६ मध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १७.०३.२०१६ रोजी दिलेल्या आदेशानुसार मुंबईचे नगरपाल कार्यालयातील उपनगरपाल या पदास दि.४ जुलै, २००३ पासून रु.१४२००-३५०-१५९५०-४००-१८३५० ही वेतनश्रेणी मंजूर करण्यात येत आहे.

२. सदर आदेश वित्त विभाग, अनौपचारिक संदर्भ क्र.२६१/२०१७/सेवा-९, दि.३१/०८/२०१७ अन्वये मिळालेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहेत.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०५१८१६२९४६७९१२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Amogh Shyamkant Kaloti

Digitally signed by Amogh Shyamkant Kaloti
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Law and Judiciary Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=1f733daf00a6028414c43d0cc10d82acab3b732c4edd56e818f8a3b355588753, serialNumber=9ebeebf21dc54ceec51e6d5ffc84bb94ca6af89497279007d66e97dc13547037, cn=Amogh Shyamkant Kaloti
Date: 2018.05.18 16:28:38 +05'30'

(अ.शा.कलोती)

विधि सल्लागार नि सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. महाप्रबंधक, उच्च न्यायालय, मुंबई,
२. प्रबंधक, उच्च न्यायालय(अपील शाखा / मुळ शाखा), मुंबई,
३. प्रबंधक / प्रोथोनोटरी आणि सिनीयर मास्टर, उच्च न्यायालय, मुंबई
४. उपनगरपाल, नगरपाल यांचे कार्यालय, जुने सचिवालय, कर्मवीर भाऊराव पाटील मार्ग, मुंबई-३२ यांना विनंती करण्यात येते की, या संदर्भात पुढील आवश्यक ती कार्यवाही करुन या विभागास अवगत करावे.
५. महालेखापाल- एक (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा), मुंबई,
६. महालेखापाल- दोन (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा), नागपूर,
७. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
८. निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई
९. वित्त विभाग सेवा -९/व्यय-५, मंत्रालय, मुंबई
१०. विधि व न्याय विभागातील सर्व कार्यासने
११. निवड नस्ती.